# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रेसनोट

- **मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नागरिकांना मालमत्ता कर संबंधित असलेल्या तक्रारींचे निवारण करण्याकरिता मा. आयुक्त यांच्या निर्देशानुसार दर गुरुवारी "तक्रार सप्ताहचे" आयोजन**

दिनांक 08 जुलै 2024 रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या मार्गदर्शनाखाली, अतिरिक्त आयुक्त संभाजी पानपट्टे यांच्या उपस्थितीत मालमत्ता कर विभागामार्फत "तक्रार सप्ताह" आयोजन करणेकामी आढावा बैठक घेण्यात आली. सदर बैठकीस सहाय्यक आयुक्त मालमत्ता कर विभाग चंद्रकांत बोरसे, सिस्टीम मॅनेजर राज घरत व सर्व कर निरीक्षक उपस्थित होते.

मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मालमत्ता धारकांच्या मालमत्ता कर विषयक दिल्या जाणाऱ्या अधिसुचित सेवा, पारदर्शक, गतिमान व विहित काळ मर्यादित देण्यासाठी तक्रार सप्ताहाचे आयोजन करण्याबाबत बाबत मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से) यांनी मालमत्ता कर विभागास निर्देशित केले होते. त्याअनुषंगाने अतिरिक्त आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली गुरूवार, दि. 11/07/2024 रोजी व त्यापुढील दर गुरुवारी (शासकीय सुटटीचे दिवस वगळून) दुपारी 3.00 ते 5.00 या वेळेत मिरा भाईंदर महानगरपालिका, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, स्थायी समिती सभागृह भाईंदर (पश्चिम) येथे, "मालमत्ता कर तक्रार सप्ताहाचे" आयोजन करण्यात आले आहे. या तक्रार सप्ताहात मालमत्ता कर आकारणी, नावात व पत्त्यात दुरुस्ती, कर विभागणी, देयकात दुरुस्ती व मालमत्ता कराच्या सबंधित इतर तक्रारींचे निवारण करण्यात येणार आहे. सदर मालमत्ता तक्रार सप्ताहात नोंदवही तयार करून आलेल्या तक्रारींचे आठ दिवसात निराकरण करून दर गुरूवारच्या बैठकीत केलेल्या कार्यवाहीची माहिती मा. आयुक्त यांना देण्यात येणार आहे. नागरिकांनी आपल्या मालमत्ता कर बाबत तक्रारी असल्यास नियोजित केलेल्या तक्रार सप्ताहासाठी महापालिका मुख्य कार्यालयात दर गुरुवारी दुपारी 3.00 ते 5.00 वाजेपर्यंत अर्ज व कागदपत्रासह उपस्थित राहण्याचे आवाहन मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांनी मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सर्व मालमत्ता धारकांना केले आहे.